जळगाव : दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेत प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरण (इंडक्शन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रथम वर्ष केमिकल इंजिनिअरींग, फुड टेक्नॉलॉजी, प्लास्टीक टेक्नॉलॉजी, पेन्ट टेक्नॉलॉजी या विभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. स्वयंदीप प्रतिष्ठानचे संस्थापक संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रा. गणेश बाठे होते तर संयोजन प्रा. राम गोरे यांनी केले संचालक प्रा. जे. बी. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रज्ञा सुरवाडे यांनी सूत्रसंचालन केले तर विश्वराज तायडे यांनी आभार मानले.

## बातमी नं. २

जळगाव : दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या 'खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी' ऑनलाईन व्याख्यानमालेत मंगळवार दि. २९ नोव्हेंबर रोजी प्रा. हेमंत खडके यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

डॉ. खडके हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात मराठी विभाग प्रमुख आहेत. मंगळवारी सायं. ४ वाजता 'सुखी माणसाचा सदरा' या विषयावर ते ऑनलाईन व्याख्यान देणार असून अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विनोद पाटील राहतील. अशी माहिती विभागाचे संचालक प्रा. आशुतोष् पाटील यांनी दिली. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व्याख्यानाची लिंक उपलब्ध करून दिली जाणार आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २४ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी